# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 16/09/2021 (गुरूवार)
(सकाळ)

---

### मोटरसायकल चोरी

1) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 3 कि.मी. अंतरावरील भारकस येथे फिर्यादी नामे– आकाश गजानन बावने वय 25 वर्ष रा. भारकस ता. हिंगणा जि. नागपूर व त्याचा मित्र आकाश उसाळे रा. देउळवाडा जि. वर्धा हे सोबत एकाचं रूम मध्ये राहत होते. दिनांक 12/09 2021 चे 06.30 वा. ते 09.30 वा. दरम्यान फिर्यादीची एमएच–32/एआर– 4486 क्रमांकाची मोटरसायकल टीव्हीएस कि. 50,000/–रु. चा मुद्देमाल त्याचे मित्राने चोरून नेल्याचे संशयावरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुधाकर लोहकरे हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 8 कि.मी. अंतरावरील मौजा हमलापुरी शिवार येथे दिनांक 14/09 2021 चे 09.00 वा. ते 15.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– यशदेव चंद्रभान मेहर वय 42 वर्ष रा. अरोली यांनी आपली एमएच–40/बीटी– 4628 क्रमांकाची मोटारसायकल हिरो होंडा शाईन उभी करून कामावर गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपी फिर्यादींची किमंत 40,000/–रु. ची मोटरसायकल चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सदाशिव काठे मो. क्र 9011326793 हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. उमरेडः– अंतर्गत 0.5 कि.मी. अंतरावरील नायडु बाजार पंटागण जोगीठाणापेठ उमरेड येथे फिर्यादी नामे– नरेश रातजी भाजीपाले वय 50 वर्ष रा. वायगांव ता. उमरेड यांची गाडी त्यांच्या ड्रायव्हर नी नायडु बाजार पंटागणात दि.14/09/21 रोजी रात्री 08.00 वा. लावली होती. सकाळी दि. 15/08/21 चे 04.00 वा. गाडी ट्रिप करिता लावणे करिता गेले असता एम.एच– 40/ बिजी– 2227 क्रमांकाचा मिनी ट्रक टाटासुमो गोल्ड चार चाकी गाडी ड्रायव्हर ला गाडी दिसली नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीची मिनी ट्रक टाटासुमो गोल्ड चोरून नेली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार विठठल तितरमारे पो.स्टे. उमरेड मो. क्र. 9823112399 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर